



दैनिक **आरंभपर्व**
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





• वर्ष : ०३ • अंक : १९० • पुणे • सोमवार, दि. ३० मार्च २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313


# खरात प्रकरणात ट्विस्ट : ब्लॅक मनी व्हाईट करण्याचा धंदा?

## तिसरा व्यक्ती कोण? सुषमा अंधारेंचा फोटो दाखवत केसरकरांवर आरोप

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भोंदू अशोक खरात प्रकरणात आता दररोज नवनवीन खुलासे होत असून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आज पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेऊन खळबळजनक आरोप केले आहेत. अशोक खरात आणि शिंदे गटाचे आमदार दीपक केसरकर यांच्यातील दुव्याचे फोटो पुराव्यासह सादर करत, अंधारे यांनी या प्रकरणात 'ब्लॅक मनी व्हाईट' करण्याचे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचा संशय



व्यक्त केला आहे. "केसरकरांसोबत प्रत्येक फोटोत दिसणारा तो 'पिवळ्या शर्टाचा' माणूस नेमका कोण?" असा सवाल अंधारे यांनी केला आहे. या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

अशोक खरात प्रकरणात ठाकरे गटाकडून याआधी देखील शिंदे गटाचे आमदार दीपक केसरकर यांचे खरातसोबतचे फोटो दाखवत गंभीर आरोप केले होते. त्यानंतर दीपक केसरकर यांनी देखील पत्रकार परिषद घेतली.

अशोक खरात प्रकरणाशी माझा संबंध नसल्याचे सांगत, त्यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावले. राजकीय द्वेषापोटी माझ्याविरोधात कट कारस्थान असल्याचे दीपक केसरकर म्हणाले होते. आज सुषमा अंधारे यांनी पुन्हा काही फोटो समोर आणून मोठे दावे केलेत.

### केसरकरांचा दावा बालिश आणि हास्यास्पद

**दीपक केसरकर यांनी आपल्यावर होत असलेले आरोप हे 'कट कारस्थान' असल्याचे म्हटले होते. पण सुषमा अंधारे यांनी हा आरोप फेटाळून लावला. यावर बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, "केसरकर म्हणतात माझ्याविरोधात कारस्थान सुरू आहे, पण हे ऐकून मला दुःख वाटत नाही, तर त्यांचे विधान बालिश आणि हास्यास्पद वाटते. जर ते विचारत असतील की ३९ लोक सोडून मलाच का लक्ष्य केले जात आहे? तर याचा अर्थ असा होतो की, केसरकर स्वतः मान्य करत आहेत की ते अशोक खरातच्या संपर्कात होते. केसरकरांनी 'भांडाफोड करेन' अशी पोकळ धमकी देण्यापेक्षा, त्या ३९ लोकांची नावे एकदाची सांगूनच टाकावीत," असे थेट आव्हान सुषमा अंधारे यांनी दिले.**

सुषमा अंधारे यांनी आजच्या पत्रकार परिषदेत काही छायाचित्रे दाखवली. यात एक पिवळा शर्ट घातलेला व्यक्ती प्रत्येक ठिकाणी केसरकर आणि अशोक खरात यांच्यासोबत दिसत आहे. नामकर्ण एकनाथ आवारे असे त्या व्यक्तीचे नाव आहे. अंधारे म्हणाल्या, "मी आधीही एमआयडीसी गेस्टहाऊसमधील फोटो दाखवले होते. हा माणूस केसरकरांसोबत नेमका काय करतोय? इतकेच नाही तर चाकणकर जेव्हा खरातची पाद्यपूजा करत होत्या, तेव्हाही हा व्यक्ती तिथे हजर होता. या माणसाचे नाव नामकर्ण एकनाथ आवारे असून तो 'जगदंब पतसंस्थेचा' प्रमुख आहे," अशी माहिती अंधारे यांनी उघड केली.

# मुंबईचा वानखेडेवर धमाका!

## १४ वर्षानंतर पहिल्यांदाच विजयी सलामी, रोहित शर्मा आणि रिकल्टनच्या तडाखेबंद खेळीने यश साजरं

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयपीएल 2026 मधील दुसऱ्या सामन्यात मुंबई इंडियन्सने वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्सचा 6 विकेट्सनी धुव्वा उडवत हंगामाची विजयी सुरुवात केली. तब्बल 14 वर्षांनंतर मुंबईने स्पर्धेतील पहिलाच सामना जिंकत चाहत्यांना मोठी भेट दिली. प्रथम फलंदाजी करताना कोलकाताने दमदार खेळ करत 4 विकेट्स गमावत 220 धावांचा प्रचंड डोंगर उभा केला. मोठं लक्ष्य उभं राहिल्यानंतर मुंबईवर दबाव असणार असं वाटत होतं, पण रायन रिकल्टन आणि रोहित शर्माने आक्रमक सुरुवात करत सगळं चित्रच बदलून टाकलं. 2012 नंतर पहिल्यांदाच मुंबई इंडियन्सने आयपीएलमधील आपला पहिला सामना जिंकण्याचा पराक्रम केला.

मुंबईचा कर्णधार हार्दिक पांड्याने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला, जो चांगलाच महागात पाडला. सुरुवातीलाच अजिंक्य रहाणे आणि फिन ॲलन यांनी केकेआरला जबरदस्त सुरुवात करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी 69 धावांची भागीदारी केले. जसप्रीत बुमराह, हार्दिक पांड्या यांसारख्या आघाडीच्या गोलंदाजांनाही त्यांनी सोडले नाही. मात्र, ही जोडी शार्दुल ठाकूरने फोडत मुंबईला पहिले यश मिळवून दिले. फिन ॲलनने 17 चेंडूत 37 धावांची तुफानी खेळी केली. त्यानंतर आलेल्या कॅमेरून ग्रीननेही थोडा प्रतिकार केला, पण शार्दुल ठाकूरने त्यालाही 18 धावांवर बाद करत केकेआरला दुसरा धक्का दिला. यानंतर कर्णधार अजिंक्य रहाणेने डाव सांभाळत आक्रमक फलंदाजी केली. त्याने 40 चेंडूत 67 धावांची शानदार खेळी साकारली. त्याच्या खेळीत 5 षटकार आणि 3 चौकारांचा समावेश होता. रहाणेचा फॉर्म पाहता तो मोठी खेळी करणार असे वाटत असतानाच पुन्हा एकदा शार्दुल ठाकूरने त्याला बाद करत मुंबईला महत्त्वाचे यश मिळवून दिले. दुसऱ्या बाजूला अंगकृष रघुवंशीनेही तितक्याच आक्रमक शैलीत फलंदाजी करत 29 चेंडूत 51 धावा ठोकल्या. अखेरीस रिंकू सिंगने 21 चेंडूत नाबाद 33 धावा करत संघाचा स्कोअर 220 पर्यंत पोहोचवला. मुंबईकडून शार्दुल ठाकूर सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने 3 विकेट घेत केकेआरच्या फलंदाजांना आवर घालण्याचा प्रयत्न केला, तर कर्णधार हार्दिक पांड्याला 1 विकेट मिळाली.



### रोहित-रिकल्टनची वादळी सुरुवात

**221 धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सला सलामीवीर रोहित शर्मा आणि रायन रिकल्टन यांनी धडाकेबाज सुरुवात करून दिली. रोहित शर्मा 78 धावांवर बाद झाला. सूर्यकुमार यादव 8 चेंडूंत तीन चौकारांसह 16 धावांवर बाद झाला. रिकेल्टनने मुंबईसाठी 43 चेंडूंत 81 धावांची सर्वात मोठी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने आठ षटकार आणि चार चौकार मारले. हार्दिक पांड्या 18 धावांवर आणि नमन धीर 5 धावांवर नाबाद राहिले. अशाप्रकारे, मुंबई इंडियन्सने चार गडी गमावून लक्ष्य गाठले आणि सहा गडी राखून विजय मिळवला.**

### हार्दिकच्या नेतृत्वाखाली इतिहास बदलला


**मुंबई इंडियन्ससाठी हा विजय अत्यंत खास आहे. 2012 नंतर मुंबईला एकदाही आयपीएलमधील आपला पहिला सामना जिंकता आला नव्हता. सलग 13 हंगाम सलामीचा सामना हरण्याचा नकोसा विक्रम मुंबईच्या नावावर होता. मात्र, हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली संघाने हा 'कलंक' पुसून काढला आणि विजयाचा गुलाल उधळला.**


## ठळक बातम्या

### पुण्यात अंधश्रद्धेचा पगडा कायम

**पुणे (आरंभ पर्व) : शिक्षणाचे माहेरघर आणि आयटीचे हब अशी ओळख असलेल्या पुरोगामी पुण्यावर अद्यापी जादूटोणा, अघोरी प्रथा अशा अंधश्रद्धेचा पगडा कायम आहे. महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंध कायद्यानुसार पुणे शहर व परिसरात गेल्या पाच वर्षांत पन्नासहून अधिक गुन्हे दाखल झाले आहेत. यावरूनही हेच स्पष्ट होते. नाशिकजवळील मिरगावचा भोंदू अशोक खरातचे प्रकरण राज्यभर गाजत असतानाच माहिती अधिकार कार्यकर्ते सचिन नेलेकर यांनी पोलिसांकडून मिळविलेल्या माहितीमुळे पुण्यातील अंधश्रद्धेबाबतचे हे भयानक वास्तव समोर आले आहे.**












# संरक्षण व हक्क



हिंदू, बौद्ध आणि शीख या धर्मातील कोणत्याही अनुसूचित जातीतील व्यक्तीने म्हणजे एससीने धर्मांतर केले तर एससी म्हणून मिळणारे लाभ, संरक्षण व हक्क तो गमावतो. सर्वोच्च न्यायालयाने हा ऐतिहासिक निर्णय दिला.

त्यामुळे बऱ्याच काळापासून सुरू असलेला गोंधळ व याबाबतची अनिश्चितता संपुष्टात येण्यास आता हरकत नाही. अगोदर आंध्र प्रदेश न्यायालयाने याबाबतचा निर्णय दिला होता.

एका व्यक्तीने धर्मांतर केले होते. तरीही त्याच्या मूळ धर्मानुसार त्याला एससी म्हणून मिळणाऱ्या सुविधा हव्या होत्या. त्याची ही मागणी आंध्र न्यायालयाने नाकारली होती. त्या निर्णयावर आता सुप्रीम कोर्टानेही मोहोर उमटवल्यामुळे भविष्यात या विषयी कोणती संदिग्धता राहणार नाही. वास्तविक असे विषय हे सरकारच्या स्तरावरच घेतले जाणे अपेक्षित असते. त्यात कोणता संभ्रम असेल तर तो दूर करणे आवश्यक असते. त्या विषयाची साधक बाधक चर्चा करायची असते.

जेव्हा अशा चर्चांत लोकप्रतिनिधी सहभागी होतात तेव्हा विषय आपोआपच जनमानसापर्यंत पोहोचतो व त्यांच्या हरकती आणि सूचनाही समोर येत असतात. राजकीय पक्षांकडून तसे काही होऊ दिले जात नसल्यामुळे लोकांमध्ये गोंधळ राहतो व अखेर प्रकरणे न्यायालयांकडून निकाली काढली जातात. भारतात धर्मांतराचा मुद्दा केवळ जातीशी निगडीत प्रश्नांशी संबंधित राहिलेला नाही. तो केवळ न्यायालयांपुरताही मर्यादित नाही तर राजकीय नफा आणि तोट्याच्या चष्म्यातूनही त्याकडे पाहिले जाते.

कर्नाटकमधील अलीकडचे उदाहरण यावर अधिक प्रकाश टाकते. या राज्यातील मागासवर्ग आयोगाने काही काळापूर्वी जातगणना केली. त्यात एका विशिष्ट समुदायातील तेहतीस जाती सूचिबद्ध करण्यात आल्या. हिंदू धर्मात जाती आहेत. त्या सूचिबद्ध केल्या तर समजण्यासारखे आहे. मात्र काही समुदाय असेही आहेत की ते आपल्यात जाती नसल्याचे मानतात आणि तसे म्हणतातही. तथापि, राज्य सरकारच्या आयोगाने याच समुदायातील एवढ्या मोठ्या संख्येने जाती मागासवर्गात समाविष्ट केल्यामुळे गोंधळ उडाला. त्याचे कारण आरक्षणातील वाटेकरू वाढले व खरे लाभार्थी त्यापासून वंचित होण्याचा धोकाही निर्माण झाला.

विरोधापुढे अखेर कर्नाटक सरकारला नमते घ्यावे लागले व त्यांनी आपला हा जातींना सूचिबद्ध करण्याचा निर्णय मागे घेतला. एवढे होऊनही चार जातींचा त्यांनी समावेश केला आहेच. धर्मांतराच्या मुद्द्यावर फार तपशीलात जायला नको; मात्र एखाद्या विशिष्ट परिस्थितीत हे प्रकार घडत असतात. काही वेळा आपण वंचित असल्याची भावना असते, काही वेळा आपल्या धर्माबाबत भ्रमनिरास झालेला असतो तर अनेक प्रकरणात फसवणुकीने, आमिष दाखवून अथवा बळजबरीनेही धर्मांतरे केली जातात.

पैशासाठीही ते होतात अशा बातम्या आणि ओरडही आहेच. ज्या धर्मांचा दावा आहे की त्यांच्यात जातीभेद नाही अशा धर्मांतही अलीकडच्या काळात धर्मांतरित झालेली मंडळी स्वत:ला नव्या धर्मातील वेगळे आणि दुर्बल घटक मानू लागले आहेत. त्यावरूनच त्यांच्या पूर्वीच्या धर्मात त्यांना दुर्बल घटक म्हणून जे लाभ त्यांना मिळत होते तेच आपल्याला येथेही मिळतील अशी त्यांची अपेक्षा आहे. वास्तविक हा जागरूकतेच्या अभावामुळे निर्माण झालेला त्यांचा गोंधळच आहे. पण या गोंधळातून त्यांनी बाहेर पडावे यासाठी कोणी मदत करत नाहीत.

उलट तो वाढता ठेवत अधिक संभ्रम निर्माण करून, त्यांना आमिषे दाखवून आपला राजकीय स्वार्थ कसा साधला जाईल याची दक्षता घेतली जाते. आंध्र प्रदेशातील जे प्रकरण चर्चेत आले आहे त्यात संबंधित व्यक्ती दुसऱ्या धर्माचे अनेक वर्षांपासून आचरणही करत होता. त्या धर्माच्या मान्यतेनुसार तो प्रार्थनांचे आयोजनही करत होता. असे असतानाही त्याला त्याच्या मूळ धर्मातील एससी वर्गाला जे मिळतात त्याच लाभांची अपेक्षा होती. धर्मांतर केल्यावरही याच मानसिकतेत असणारी ती एकमेव व्यक्ती नसणार आहे. कर्नाटकात सूचिबद्ध झालेल्या जाती अथवा अन्यत्र या धर्मांतरित लोकांनी स्वतंत्रपणे पुढाकार घेण्यास केलेली सुरुवात पाहता भविष्यात हा प्रकार चांगलाच गंभीर रूप धारण करू शकतो. सर्वोच्च न्यायालयाने आताच त्यावर निर्णय घेतल्यामुळे या विषयाला आता फार उग्र स्वरूप प्राप्त होण्याऐवजी अटकाव होतो का ते पाहावे लागेल.

आर्थिक आणि अन्य लाभांसाठी एकीकडे धर्मांतर करायचे मात्र त्याच वेळी राज्य आणि केंद्राकडून मिळणाऱ्या योजनांत वाटा मिळण्यासाठीही सक्रिय असायचे व असे करून खऱ्या वंचितांच्याच हक्कावर गदा येऊ शकेल असे कृत्य करणे असा दुहेरी लाभाचा प्रकार मान्य करता येण्यासारखा नव्हता. मुद्दा एवढाच आहे की सर्वोच्च न्यायालयाने आता निकाल दिला असला तरी त्यावरच विसंबून न राहता आता राज्यांनाही यात लक्ष घालावे लागेल व सुयोग्य तरतूद करावी लागेल. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वास्तवात जो वर्ग मागासलेला आहे त्यांनाच लाभ मिळाला पाहिजे.

त्यांच्यापर्यंतच तो पोहोचला पाहिजे. यात कोणती आडकाठी येता कामा नये. एससीचा दर्जा कोणाला मिळतो आणि कोणाचा हा दर्जा केव्हा आणि का समाप्त होतो हे घटनेतच पूर्वीच स्पष्ट केले गेले आहे. या सामाजिक आणि कायदेशीर श्रेणीतून बाहेर पडून नव्या धर्मात जाणाऱ्यांसाठी आता एससी अधिनियमाचा विस्तार केला जाऊ शकत नाही. कोणी केवळ स्वत:च्या लाभासाठी चुकीच्या अपेक्षा करत असेल आणि त्यासाठी दावेही करत असेल तर त्याला केवळ न्यायालयाच्या माध्यमातूनच पायबंद न घालता घटनेच्याच दाखल्याद्वारे वेळीच थोपवणे आवश्यक असेल.

# इंगळुन येथे शेतात गांजाची झाडे लावणाऱ्यास अटक

## मुद्देमाल ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखा व जुन्नर पोलीसांची कारवाई



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

आदिवासी भागातील इंगळून ता.जुन्नर येथे शेतात गांजाची झाडे लावणाऱ्या दिनकर विठ्ठल डामसे वय ६० रा. इंगळून याचे विरुद्ध जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी सांगितले.

आरोपीने त्याच्या मालकीच्या शेतजमिनीत गव्हाच्या व बाजरीच्या पिकात ६ हजार ४४५ किलो वजनाची सुमारे ६४ हजार ४५० रुपये किमतीची गांजाची लहान-मोठी ओली हिरवी एकूण ८२ झाडे. लावल्याचे आढळून आले. शेतातील लहान मोठी गांजाची झाडे जप्त करण्यात आली असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुणे ग्रामीण पोलीसांचे स्थानिक गुन्हे शाखा पथक व जुन्नर पोलीसांनी दि.२७ रोजी ही संयुक्त कारवाई केली आहे. पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अवैधरित्या सुरू असलेल्या गांजाच्या उत्पादन व विक्रीवर कारवाई करण्याच्या सूचना पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद शिरसागर यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की जुन्नर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इंगळून येथे एका शेतामध्ये अवैधरित्या गांजाची झाडे लावली आहेत. गुन्हे शाखा तसेच जुन्नर पोलीसांनी सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता गव्हाच्या तसेच बाजरीच्या शेतामध्ये गांजाची झाडे लावल्याचे दिसून आले. सदरचे शेत दिनकर विठ्ठल डामसे वय ६० राहणार इंगळून यांचे असल्याचे समजल्याने त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता सदरची गांजाची झाडे त्यांनी लावल्याचे कबूल केले. सदर ठिकाणी पंचा समक्ष पंचनामा करून गांजाची झाडे जप्त करण्यात आली असून त्याबाबत जुन्नर पोलीस स्टेशन येथील पोलीस अंमलदार अजित गेंगजे यांनी फिर्याद दिली आहे.

**सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे , उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर जुन्नरचे पोलीस निरीक्षक किरण अवचर,सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार,अरविंद गाटकुळ,पोलीस उपनिरीक्षक रघुनाथ शिंदे, ऋषिकेश तिटमे सहाय्यक फौजदार. दीपक साबळे,पोलीस हवालदार संदीप वारे,अक्षय नवले, राजू मोमिन, जुन्नरचे सागर हिले, सागर शिंदे, गणेश शिंदे, अजित गेंगजे, संतोष पठारे यांनी केली आहे.**

## 6500mAh बॅटरी आणि मिलिटरी-ग्रेड मजबुतीची साथ

## TECNO SPARK 50 5G भारतात लॉन्च

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारत कधीच थांबत नाही आणि या देशाला पुढे नेणारे लोकही नाहीत. TECNO च्या मते, तंत्रज्ञानानेही या वेगाशी जुळवून घेतले पाहिजे. TECNO SPARK 50 5G हा स्मार्टफोन भारतीय जीवनशैलीच्या अनिश्चित आणि गतिमान प्रवाहाला लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आला आहे. लांब प्रवास, धूळ, पडणे आणि अचानक येणारा पाऊस अशा परिस्थितींमध्येही हा फोन टिकून राहील, यासाठी त्याची रचना करण्यात आली आहे. लॉन्चबाबत बोलताना TECNO Mobile India चे CEO अरिजीत तलापात्रा म्हणाले,"भारतातील वेगवान बाजारपेठेत ग्राहकांना केवळ स्पेसिफिकेशन्स नव्हे, तर त्यांच्या दैनंदिन जीवनाशी जुळणारा विश्वासार्ह स्मार्टफोन हवा असतो. TECNO SPARK 50 5G हा टिकाऊपणा, कार्यक्षमता आणि विश्वासार्हता यांवर आधारित आहे." डिझाइनच्या बाबतीत हा स्मार्टफोन निसर्गप्रेरित प्रीमियम रंगांमध्ये—Fantasy Purple, Mint




Green, Champagne Gold आणि Ink Black—उपलब्ध आहे. यामध्ये MIL-STD-810H मिलिटरी-ग्रेड प्रोटेक्शन आणि IP64 प्रोटेक्शन दिले आहे. 6500mAh बॅटरी दीर्घकाळ वापर सुनिश्चित करते, तर FreeLink 2.0 तंत्रज्ञानामुळे नेटवर्क नसतानाही कनेक्टिव्हिटी मिळते. 5G+ कॅरियर ॲग्रीगेशनमुळे स्थिर नेटवर्क अनुभव मिळतो. सॉफ्टवेअरच्या दृष्टीने Segment-first All Scenario Active Noise Cancellation, AI WhatsApp Assistant, Ella Alarm Announcement, AI Writing Assistant, AI Eraser 2.0 आणि AI Image Extender यांसारख्या फीचर्ससह 120Hz डिस्प्ले देण्यात आला आहे.

## पीएमपीच्या विधी अधिकाऱ्यांचे कार्यालय केले सील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) मधील विधी अधिकारी धनेश्वर जाधव यांचे कार्यालय प्रशासनाकडून सील करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे पीएमपीएमएल वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, काही प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रियांशी संबंधित अनियमितता तसेच कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. संबंधित प्रकरणात महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी कार्यालय सील करण्यात आले असल्याची चर्चा आहे. या कारवाईमागील नेमके कारण अद्याप अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आलेले नसून, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरू असल्याचे कळते. चौकशीअंती पुढील कारवाई केली जाणार असल्याचेही संकेत मिळत आहेत.

# ई-गव्हर्नन्समध्ये जळगाव जिल्ह्याचा डंका!

## राज्यातील १५० दिवसांच्या कार्यक्रमात प्रथम क्रमांक

- **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हाधिकारी रोहन घुगे यांचा मुंबईत गौरव**
- **२०० पैकी पटकावले १८८ गुण**



**"हे यश जळगाव जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सांघिक प्रयत्नांचे व समन्वयाचे फळ आहे. जिल्हा प्रशासनाचे हे यश समस्त जळगावकर नागरिकांना समर्पित आहे."**
**- श्री. रोहन घुगे, जिल्हाधिकारी, जळगाव**

**जळगाव (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्याचे प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान आणि पारदर्शक करण्याच्या हेतूने मुख्यमंत्री मा . श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या '१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात' जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. आज मुंबई येथील 'सह्याद्री' अतिथीगृह, मलबार हिल येथे आयोजित विशेष सोहळ्यात, राज्याचे मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते जळगावचे जिल्हाधिकारी श्री. रोहन घुगे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. भारतीय गुणवत्ता परिषद (QCI) मार्फत करण्यात आलेल्या अत्यंत निकोप व सर्वंकष मूल्यमापनात जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाने २०० पैकी १८८ गुण प्राप्त केले आहेत. प्रशासकीय कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून 'Ease of Living' आणि 'Ease of Working' ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ७ मुख्य निकषांवर प्रभावी कामगिरी केली आहे. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी या कार्यक्रमात जळगाव जिल्ह्याच्या यशस्वी प्रवासाचे सविस्तर सादरीकरण केले. यात खालील बाबींचा प्रामुख्याने समावेश होता : ई-ऑफिस (e-Office): प्रशासकीय कामकाजात १००% वापर.

व्हॉट्सअॅप चॅटबॉट: नागरिकांच्या तक्रारी आणि सुविधेसाठी थेट संवाद.

आधुनिक तंत्रज्ञान: एआय (AI), ब्लॉकचेन आणि जीआयएस (GIS) प्रणालीचा नावीन्यपूर्ण वापर.

पारदर्शकता: 'आपले सरकार' प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी आणि कार्यालयीन डॅशबोर्ड.

या ऐतिहासिक कामगिरीमुळे जळगाव जिल्हा प्रशासनाचे संपूर्ण राज्यात कौतुक होत असून, हे ई-गव्हर्नन्स मॉडेल इतर जिल्ह्यांसाठीही मार्गदर्शक ठरणार आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये साहित्य, इतिहास आणि सामाजिक कार्याचा संगम

- **संभाजी बारणे यांच्या कार्याचे महापौरांकडून कौतुक**
- **थेरगावचा इतिहास ते शिवचरित्र संकलन**
- **बारणे यांची उल्लेखनीय वाटचाल**



**पिंपरी-चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

थेरगाव परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, कवी व लेखक संभाजी बाळासाहेब बारणे यांनी नुकतीच पिंपरी-चिंचवड शहराचे महापौर रवी लांडगे यांची भेट घेत शहराच्या वैभवावर आधारित आपल्या कवितासंग्रहाचे पुस्तक त्यांना भेट दिले. शहराच्या संस्कृती, विकास आणि ओळख यांचे प्रभावी चित्रण करणाऱ्या या कवितासंग्रहाचे महापौरांनी मनापासून कौतुक केले.

यावेळी संभाजी बारणे यांनी सध्या सुरू असलेल्या त्यांच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची माहिती देताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ५५१ शिवचरित्रांचे संकलन पूर्ण केल्याचे सांगितले. त्यांच्या या अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत महापौर रवी लांडगे यांनी बारणे यांच्या जिद्द, अभ्यासू वृत्ती आणि सांस्कृतिक बांधिलकीचे विशेष अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संभाजी बारणे हे केवळ कवी नसून एक संशोधक वृत्तीचे लेखक म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी 'थेरगावचा इतिहास' हे महत्त्वपूर्ण पुस्तक लिहून स्थानिक इतिहासाला उजाळा दिला आहे. याशिवाय विविध वस्तूंचे संकलन हा त्यांचा विशेष छंद असून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधींच्या व्हिजिटिंग कार्डचे केलेले संकलन 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंदले गेले आहे. आता शिवचरित्र संकलनालाही अशीच मान्यता मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांचीही बारणे यांनी भेट घेतली.

त्यांना कवितासंग्रह व 'थेरगावचा इतिहास' या पुस्तकांच्या प्रती भेट देण्यात आल्या. या पुस्तकातील ऐतिहासिक संदर्भांमध्ये शितोळे कुटुंबाच्या योगदानाचा उल्लेख असल्याची माहिती बारणे यांनी दिली. या पार्श्वभूमीवर प्रशांत शितोळे यांनीही बारणे यांच्या संशोधनपर कार्याचे कौतुक केले. 'थेरगावचा इतिहास' या पुस्तकात बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या कारकिर्दीत शितोळे यांच्याकडे कारभाराची जबाबदारी सोपविण्यात आली होती, तसेच थेरगाव, पिंपळे सौदागर परिसरातील शेतसारा व्यवस्थापनात स्थानिक कुटुंबांची भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे. या ऐतिहासिक नोंदींमुळे स्थानिक वारसा आणि सामाजिक रचनेचे महत्त्व अधोरेखित होते.

सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, कला आणि पर्यावरण अशा विविध क्षेत्रात सक्रिय असलेले संभाजी बाळासाहेब बारणे यांचे कार्य पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानास्पद असल्याचे महापौर रवी लांडगे व पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी नमूद केले. आगामी काळात शिवचरित्र संकलनाच्या माध्यमातून इतिहासाची जपणूक आणि प्रेरणादायी वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे बारणे यांचे ध्येय असल्याचेही त्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### रामदासजी आठवले यांनी सदाफुले परिवाराची सांत्वन पर भेट घेतली

**पुणे (आरंभ पर्व) : रिपब्लिकन पक्षाचे पुणे शहर सरचिटणीस शाम सदाफुले यांच्या मातोश्री विमल सदाफुले यांचे 18 मार्च रोजी दुःखद निधन झाले. सदाफुले परिवाराची विचार पूस करण्या करिता रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय मंत्री मा. रामदासजी आठवले साहेब यांनी काळवश विमल सदाफुले यांच्या पुण्यानुमोदन दिनाच्या दिवशी सदाफुले परिवारची येरवडा येथील राहत्या घरी सांत्वन पर भेट घेतली. शाम सदाफुले यांच्या वडिलांची आठवले साहेबांनी आस्थेने विचारपूस केली. याप्रसंगी उपमहापौर परशुराम वाडेकर, अध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, सरचिटणीस महिपाल वाघमारे, नगरसेविका हिमाली कांबळे, निलेश आल्हाट, जयदेव रंधवे, सुधीर वाघमोडे, संतोष आरडे व रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.**

### वारजे चौकात वळण घेताना प्लास्टर शीट्सने भरलेला ट्रक पलटी

**पुणे (आरंभ पर्व) : वारजे सेवा रस्त्याकडून शिवणे-उत्तमनगरच्या दिशेने जाणारा ट्रक (एमएच १२ बीएफ ०९७५) वारजे येथील स्व. आमदार रमेश वांजळे चौकात वळण घेताना शनिवारी (दि. २८) अचानक उलटला. हा चौक अत्यंत वर्दळीचा असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता होती. मात्र सुदैवाने त्या वेळी चौकात कोणतीही गर्दी नसल्याने कोणालाही इजा झाली नाही आणि जीवितहानी टळली. अपघातानंतर ट्रकमध्ये भरलेल्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या शीट्स तातडीने बाहेर काढून दुसऱ्या ट्रकमध्ये हलवण्यात आल्या. दरम्यान, ऐन चौकात ट्रक उलटल्यामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि वाहतूक पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तत्काळ वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. क्रेनच्या मदतीने उलटलेला ट्रक बाजूला करण्यात आला आणि काही वेळातच वाहतूक पुन्हा पूर्ववत करण्यात आली. या घटनेमुळे पुन्हा एकदा चौकातील वाहतूक व्यवस्थापन आणि मोठ्या वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्याची गरज अधोरेखित झाली आहे.**

### बेकायदा आणि चढ्या दराने सिलिंडर विक्री करणाऱ्या गॅस एजन्सीला दणका

**पुणे (आरंभ पर्व) : बेकायदा आणि चढ्या दराने गॅस सिलिंडर केल्याप्रकरणी हिंजवडी येथील मे. श्री लक्ष्मी भारतगॅस या एजन्सीवर जिल्हा प्रशासनाने कारवाई केली आहे. एजन्सीला तत्काळ पुरवठा बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, वितरणाचा परवानादेखील रद्द करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी दिली. जिल्ह्यातील ही पहिलीच कारवाई ठरली आहे. या एजन्सीकडे भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडमार्फत व्यावसायिक एलपीजी सिलिंडर विक्रीचा अधिकृत परवाना आहे. मात्र, गुरुवारी (दि. २६) सिलिंडर वितरण करताना राज्य सरकारने ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमाचे पालन न करता अनधिकृत व नोंदणी नसलेल्या व्यक्तींना सिलिंडर वाटप केल्याचे आढळले. तसेच अधिक नफा मिळविण्याच्या उद्देशाने जादा दराने सिलिंडर विक्री केल्याचेही निदर्शनास आले आहे.**

### १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कार्यक्रमात राज्यात प्रथम क्रमांकाचा मान

**पुणे (आरंभ पर्व) : मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत झालेल्या मूल्यमापनात पुणे जिल्हा परिषदेला २०० पैकी १९६.२५ गुण प्राप्त करून राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे; सेवाकर्मी कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषदेची 'प्रथम' क्रमांकाने निवड झाली आहे. मुंबई येथील सह्याद्री सभागृहात पार पडलेल्या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील शासकीय कार्यालयांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यात आले. यामध्ये सात महत्त्वाच्या घटकांवर- कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता व ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर तसेच भौगोलिक माहिती प्रणालीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यालयांची निवड करण्यात आली. श्री. गजानन पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून जिल्हा परिषदेने डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात अभिनव उपक्रम राबवून नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक व जलद सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत.**






दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

सोमवार, दि. ३० मार्च २०२६









# महाराष्ट्राला पुन्हा एकदा नरेंद्र दाभोलकर पाहिजे



**(दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्राची ओळख ही संत, समाजसुधारक आणि प्रबोधनकारांची आहे. संत तुकाराम, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान व्यक्तींनी समाजाला विवेक, समता आणि विज्ञाननिष्ठ विचार दिले. या परंपरेत आधुनिक काळात एक ठाम, निर्भीड आणि विवेकवादी आवाज म्हणून उभे राहिलेले नाव म्हणजे नरेंद्र दाभोळकर.

आज महाराष्ट्रात अंधश्रद्धा, ढोंगीपणा आणि भावनिक फसवणुकीच्या घटना पुन्हा वाढताना दिसत आहेत. श्रद्धा आणि भीती यांच्या आडून सामान्य नागरिकांची फसवणूक होत आहे. या पार्श्वभूमीवर समाजमनातून एकच हाक उमटते "महाराष्ट्राला पुन्हा एकदा नरेंद्र दाभोलकर पाहिजे!" डॉ. दाभोलकर यांनी आयुष्यभर अंधश्रद्धेविरुद्ध लढा उभारला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या माध्यमातून त्यांनी गावोगावी जाऊन लोकांना जागृत केले. त्यांचे कार्य केवळ अंधश्रद्धा

**श्री. महेश वरवटे**

उघड करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी लोकांना विचार करण्याची सवय लावली. "प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही" हे त्यांनी समाजाला पटवून दिले.

जादूटोणा, भूतबाधा, चमत्कार या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीचा त्यांनी अनेकदा पर्दाफाश केला. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना नव्याने जगण्याची दिशा मिळाली. २०१३ साली घडलेल्या नरेंद्र दाभोळकर असोसिएशन या दुर्दैवी घटनेने महाराष्ट्र हादरला. एका निर्भीड आणि सत्यवादी आवाजाला कायमचे शांत करण्यात आले. परंतु विचार कधीच मरत नाहीत. दाभोलकर गेले, पण त्यांनी पेटवलेली जागृतीची ज्योत आजही समाजात प्रज्वलित आहे. तंत्रज्ञानाच्या युगात जग पुढे जात असताना समाजातील काही घटक अजूनही अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकलेले आहेत. आजही "चमत्कार" दाखवणारे ढोंगी, भविष्य सांगणारे भोंदू आणि भीती निर्माण करून लोकांची आर्थिक व मानसिक फसवणूक करणारे लोक सक्रिय आहेत. ही समस्या केवळ ग्रामीण भागापुरती मर्यादित नाही; शहरी भागातही अनेक सुशिक्षित लोक अंधविश्वासाच्या जाळ्यात अडकताना दिसतात, ही अधिक चिंतेची बाब आहे.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत. कायदे भीती निर्माण करू शकतात, पण विचार बदलण्यासाठी समाजामध्ये जागरूकता आवश्यक आहे. शिक्षण, संवाद आणि विवेकशील दृष्टिकोन यांमधूनच खरा बदल घडू शकतो.

दाभोलकरांनी हाच मार्ग स्वीकारला होता. लोकांपर्यंत जाऊन सत्य समजावून सांगणे. आजची तरुण पिढी माहिती आणि ज्ञानाने समृद्ध आहे. जर ही पिढी विवेक, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि विज्ञाननिष्ठ विचार आत्मसात करेल, तर समाजात मोठा सकारात्मक बदल घडू शकतो. शाळा, महाविद्यालये आणि समाजाच्या प्रत्येक स्तरावर जागृती निर्माण होणे आवश्यक आहे. दाभोलकर हे केवळ व्यक्ती नव्हते, तर एक विचार होते. जर प्रत्येक व्यक्तीने अंधश्रद्धेला नकार देऊन विवेकाचा मार्ग स्वीकारला, तर समाजात हजारो "दाभोलकर" तयार होऊ शकतात. महाराष्ट्राची खरी प्रगती ही केवळ भौतिक विकासात नसून विचारांच्या प्रगतीत आहे. अंधश्रद्धा, अज्ञान आणि भीती यांवर मात करून विवेक, विज्ञान आणि मानवतेचा मार्ग स्वीकारणे हीच खरी प्रगती आहे. "दाभोलकर व्यक्ती म्हणून नाही, तर विचार म्हणून पुन्हा उभे राहिले, तरच महाराष्ट्र खऱ्या अर्थाने प्रगत होईल."

## थोडक्यात पण महत्वाचे



### व्यंकटसाई होंडा सेल्स अँड सर्व्हिसेस तर्फे धायरीत शोभायात्रेचे स्वागत

- महिलांचा लक्षणीय सहभाग

पुणे (आरंभ पर्व) : सरकार प्रतिष्ठान आणि अखिल नखवीर तानाजी मालुसरे पथ श्रीराम नवमी उत्सव समितीच्या वतीने श्रीराम नवमी निमित्त आयोजित भव्य मिरवणकीत यंदा सामाजिक जनजागृतीसोबत पारंपरिक, संस्कृतीचा देखील उत्साहपूर्ण संगम पाहायला मिळाला. महिलांच्या सुरक्षेचा संदेश देत आणि युवक- युवतीमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात आले. या मिखणूकीत मल्हार-बानू विवाह सोहळ्याचे सादरीकरण, परशुराम वाद्य पथक आकर्षक श्रीराम रथ, कर्नाटकी देखावे, वारकरी भजनी मंडळ तसेच पारंपरिक बँड यांचा समावेश होता. रामनवमी आयोजित या शोभायात्रेचे जंगी स्वागत धायरी येथील व्यंकटसाई होंडा सेल्स अँड सर्व्हिसेस तर्फे पुष्पवृष्टी करून करण्यात आले. तसेच पाण्याच्या बाटलीचे वाटप देखील करण्यात आले. त्यांच्या या कार्यात कर्मचारी वर्ग व सुहासबापू चाकणकर मित्र परिवार चे ही योगदान राहिले आहे. या मिरवणूकीत महिलांच मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. या प्रसंगी संतोष कदम, प्रदीप रासकर, सनी चाकणकर, विजय चाकणकर, विक्रम चाकणकर, निलेश ससाने, हर्षल मळेकर उपस्थित होते.

### पिंपरी-चिंचवड 'आरटीओ'त खरमाटेंचे 'वसुली रॅकेट'? चर्चेस ऊत

पिंपरी (आरंभ पर्व) : आरटीओ विभागात बदली आणि वसुलीचे संगनमताने चालणारे रॅकेट राज्यभर कार्यरत असल्याचा आरोप कॉंग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत केला. या रॅकेटचे सूत्रधार म्हणून सेवानिवृत्त उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बजरंग खरमाटे यांचे नाव पुढे आले असून, पुणे आणि पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयांमध्येही त्यांची यंत्रणा सक्रिय असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. पूर्वीच्या परिवहनमंत्र्यांच्या कार्यकाळात खरमाटे यांनी बदलीप्रक्रियेत हस्तक्षेप करत स्वतंत्र जाळे उभे केले होते. सध्या ते काही सहकाऱ्यांच्या मदतीने राज्यभर वसुलीचे रॅकेट चालवत असल्याचा आरोप आहे. या माध्यमातून अधिकाऱ्यांवर दबाव टाकून मनासारख्या बदल्या आणि आर्थिक व्यवहार घडवून आणले जात असल्याचे वडेट्टीवार त्यांनी नमूद केले. चंद्रपूर येथे काही अधिकाऱ्यांनी या दबावाला विरोध केल्यावर त्यांच्यावर कारवाई घडवून आणण्यासाठी पोलिस यंत्रणेचा गैरवापर केल्याचा आरोपही करण्यात आला. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत बनावट सापळे रचून कारवाई करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. खरमाटे हे पोलिस अधिकाऱ्यांच्या माध्यमातून संपूर्ण यंत्रणेवर दबाव निर्माण करत असल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, पुणे आणि पिंपरी-चिंचवड आरटीओमध्ये काही मोटार वाहन निरीक्षक आणि सहायक निरीक्षक या कथित यंत्रणेच्या दबावाखाली काम करत असल्याचे पुढे आले आहे. खरमाटे यांच्या सांगण्यावरून नियमांना बगल देत कामे करण्यास भाग पाडले जात असून, त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांवर होत असल्याचा आरोप करण्यात आला. काही अधिकारी स्वेच्छेने या वसुलीच्या साखळीत सहभागी असल्याचेही सूचित करण्यात आले. राज्यभर वसुली रॅकेटच्या आरोपांदरम्यान आता पुणे आणि पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयांवर नियंत्रण मिळवण्यासाठी 'खरमाटे यंत्रणे'च्या हालचाली सुरू असल्याची चर्चा आहे. स्थानिक पातळीवर प्रभाव वाढवण्यासाठी आणि यंत्रणा ताब्यात घेण्यासाठी काही अधिकाऱ्यांमार्फत सक्रिय प्रयत्न सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

# कोल्हापूरची अमृता पुजारी ४ थी महिला महाराष्ट्र केसरी!

## कोल्हापूरच्याच वेदिका सासणेला अस्मान दाखवून महाराष्ट्र केसरी किताबावर कोरले नावं

- चांदीची गदा आणि सोनेट कारचे बक्षीस पटकावले
- उपविजेती वेदीका सासणे बुलेटची मानकरी



**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

सोलापुरात रविवारी झालेल्या चौथ्या महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेच्या चित्तथरारक अंतिम लढतीत कोल्हापूरच्या अमृता पुजारीने वेदिका सासनेला अस्मान दाखवत महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळवला.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आणि निर्झरा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरातील हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर रविवारी सायंकाळी महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेची अंतिम लढत अमृता पुजारी विरुद्ध वेदिका सासणे यांच्यात झाली. सुरुवातीपासून अमृता हिने आक्रमक चाल खेळत वेदिकाला कब्जात ठेवले. पहिल्या दीड मिनिटात दोन गुण मिळवत आघाडी घेतली. त्यानंतर पुन्हा तीन गुण मिळवून पहिल्या सत्रात पाच शून्य अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सत्रात वेदिकाने आक्रमक चाल खेळली परंतु अमृताने संयम दाखवत पुन्हा दोन गुण घेतले आणि विजय पक्का केला. शेवटचे दोन मिनिटे अमृताने डिफेन्स करत वेदिकाला थोपवून ठेवले. ७-० अशा फरकाने अमृताने वेदिकाचा पराभव करत महाराष्ट्र केसरीचा मान मिळवला.

**या संपूर्ण कुस्ती स्पर्धेचे युवराज केचे यांनी रांगड्या भाषेत सूत्रसंचालन केले. मुख्य कुस्त्यांमध्ये महिला कुस्तीपटू टाकल्यानंतर त्याचे बहारदार शब्दात सूत्रसंचालन केचे करीत होते.त्यांच्या जोडीला कुस्ती संपल्यावर चिअर गर्ल प्रमाणे ढोलीबाजाची साथ होती.**

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते विजेत्या अमृता पुजारी हिला चांदीची गदा , रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व सोनेट कारची चावी प्रदान करण्यात आली. तर उपविजेत्या वेदिका सासनेला २५ हजार रुपये रोख ,स्मृतिचिन्ह आणि बुलेट बक्षीस देण्यात आली . दरम्यान अमृता पुजारी हिने वेदिका सासने हिच्यावर मात केल्यानंतर समर्थक महिला कुस्तीपटू यांनी अमृता पुजारी आणि प्रशिक्षक दादासो लवटे यांना खांद्यावर घेऊन कुस्तीच्या मैदानामधून हलगीच्या कडकडाटात मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला. यावेळी फटाक्यांची मोठी आतषबाजी करण्यात आली.

यावेळी महापौर विनायक कोंड्याल,हिंद केसरी योगेश दोडके,आयोजक स्वाती अळळीमोरे-साखरे, अक्कलकोट अन्नछत्र मंडळाचे संस्थापक जन्मेनजयराजे भोसले, ट्रिपल महाराष्ट्र केसरी भाग्यश्री फड, महाराष्ट्र केसरी मुन्नालाल शेख, समाधान घोडके, उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले, मौला शेख, उमेश सूळ, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जि.प. उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, रमेश बारसकर, सागर कल्याणशेट्टी, पैलवान लोखंडे, उद्योजक सागर कत्ते,

**महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत अनेक लढती अटीतटीच्या झाल्या. या कुस्तीपटूना पाठीमागून डावपेच सांगताना प्रशिक्षकांची धडपड दिसत होती. या प्रशिक्षकांच्या बाजूला त्यांच्या कुस्ती केंद्रातील इतर खेळाडू देखील कुस्ती खेळणाऱ्या महिला कुस्तीपटूंना प्रोत्साहन देताना दिसल्या.**

**महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा ऐन उन्हाळ्यात होती. त्यात सोलापूरचे तापमान 40 अंशापर्यंत होते. परंतु आयोजकांनी फॅन आणि कुलरची व्यवस्था करून तेथील तापमान मेंटेन ठेवले. ही स्पर्धा जास्तीत जास्त लोकांना पाहता यावी यासाठी दोन मोठ्या एलईडी स्क्रीनची सोय करण्यात आली होती. एवढी मोठी स्पर्धा असूनही तुलनेने प्रेक्षकांचा प्रतिसाद कमी होता. परंतु महिला प्रेक्षक उपस्थिती उल्लेखनीय होती. या भव्य स्पर्धेचे सह प्रायोजक हरितऊर्जा निर्मिती मधील अग्रेसर कंपनी सेरेंटिका रिन्यूएबल्स असून ह्याचे आयोजन निरझरा केअर फाउंडेशनच्या अध्यक्षा स्वाती अळ्ळीमोरे साखरे यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे.**

# पुण्यात रंगणार 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो'चा जागर

## १५ मे पासून मोशीत भव्य आयोजन



**पुणे / पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

मराठा समाजातील उद्योजकतेला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्था' सज्ज झाली आहे. संस्थेच्या वतीने येत्या १५, १६ आणि १७ मे रोजी मोशी येथील पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र येथे 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा अधिकृत लोगो आणि टिझर नुकताच एका पत्रकार परिषदेत लाँच करण्यात आला. यावेळी संस्थेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संजय वायाळ, पुणे जिल्हा अध्यक्ष अर्जुन खामकर, बाळासाहेब गायकवाड, महेश आंबड, गणेश जाधव, गणेश औत्ताडे, विजय भोसले, विक्रम नाणेकर व पधादीकारी उपस्थित होते. या प्रदर्शनात १००० पेक्षा जास्त उद्योजक आपले उत्पादन आणि सेवा जगासमोर मांडणार आहेत. यामुळे स्थानिक उद्योगांना मोठी बाजारपेठ मिळण्यास मदत होईल. दररोज ५ नामवंत जागतिक उद्योजक नवउद्योजकांना यशाचे मंत्र देतील. व्यवसाय वाढीसाठी आणि तो जागतिक स्तरावर नेण्यासाठी हे मार्गदर्शन मोलाचे ठरेल. या एक्स्पोमध्ये किमान २० टक्के महिला उद्योजक आणि तरुण पदवीधारक नवउद्योजकांना सामावून घेण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. व्यवसायात भांडवल उपलब्ध व्हावे यासाठी अनेक गुंतवणूकदार या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत. तसेच, व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी १०० पेक्षा जास्त जागतिक सामंजस्य करार केले जातील. या अधिवेशनासाठी केंद्र आणि राज्य सरकारमधील विविध मंत्री तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. उद्योगाशी संबंधित शासकीय योजनांची माहिती आणि मार्गदर्शन थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा यामागचा मुख्य उद्देश आहे.

# आयआयएम मुंबईतील तीन विद्यार्थिनींचा सन्मान

## वंचित मुलींना विज्ञान-तंत्रज्ञान शिक्षणासाठी आर्थिक मदत; २१ वर्षांत १ कोटी मुलांपर्यंत पोहोच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

प्रॉक्टर अँड गॅम्बल इंडिया यांच्या 'पी अँड जी शिक्षा' या प्रमुख सामाजिक उपक्रमांतर्गत आयआयएम मुंबई येथे विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या तीन विद्यार्थिनींना "बेटियाँ शिष्यवृत्ती" प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

ही शिष्यवृत्ती योजना वंचित घटकांतील मुलींना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत व मार्गदर्शन देण्यासाठी राबविण्यात येत असून, 'सेंटर फॉर सिव्हिल सोसायटी'च्या सहकार्याने हा उपक्रम पार पडतो. ही शिष्यवृत्ती आयआयएम मुंबई इक्वॅलिटी समितच्या सहाव्या आवृत्तीच्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आली.




या कार्यक्रमास प्रॉक्टर अँड गॅम्बल इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी वी. कुमार, आयआयएम मुंबईचे संचालक मनोज कुमार तिवारी तसेच सेंटर फॉर सिव्हिल सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित चंद्रा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. 'पी अँड जी शिक्षा' उपक्रमाने गेल्या २१ वर्षांत देशभरातील १ कोटीहून अधिक मुलांपर्यंत पोहोचत त्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा घडवून आणली आहे.

या उपक्रमाअंतर्गत मुलींना शिक्षणात सातत्य राखण्यासाठी आणि नव्या औद्योगिक क्षेत्रांत संधी मिळवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. सलग चौथ्या वर्षी आयआयएम मुंबईतील विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थिनींना नवी दिशा मिळाली आहे. हिमाचल प्रदेशातील पलक ठाकूर या विद्यार्थिनीने आर्थिक अडचणींवर मात करून कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. या शिष्यवृत्तीमुळे तिला आत्मविश्वास आणि मार्गदर्शन मिळाले असून ती आज इतर विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शन करत आहे. या परिषदेत उद्योग, शासन आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी विज्ञान व उत्पादन क्षेत्रात महिलांचा सहभाग कसा वाढवता येईल, यावर चर्चा केली. 'पी अँड जी शिक्षा'चा "बेटियाँ शिष्यवृत्ती" उपक्रम हा केवळ आर्थिक मदतीपुरता मर्यादित नसून, मुलींना स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिशा, आत्मविश्वास आणि संधी देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत आहे.


SANKALP PRATISHTHAN'S

Sankalp College of Arts, Commerce and Science, Warje

WALK IN INTERVIEW

| Sr. No. | Post | Vacant Post | Social Reservations |
|---|---|---|---|
| 1. | Principal | 01 | Open to all |

Eligibility and Requirements :

As per UGC, Government of Maharashtra and SPPU rules.

Candidate with significant experience in academic, research and development and an outstanding academic track Record will be given reference.

Date of Interview - 15/04/2026

Time - 10:00 a.m. onwards

Address - Dangat Enclave, Sr. No. 140/6, NDA road, Behind Borikar Hospital, Warje malwadi Pune 411 058.

Place : Pune

Date : 30/03/2026

Sd/-

Hon. Secretary

## थोडक्यात पण महत्वाचे



## तांब्याचे हांडे चोरणाऱ्या महिलांच्या टोळीला अटक : ५५ तांब्याचे हांडे जप्त

जुन्नर (आरंभ पर्व) : येथील भांड्याचे व्यावसायिकाचे गोडाऊन मधून नव्वद तांब्याचे हांडे चोरणाऱ्या महिलांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्यांनी चोरलेल्या ९० हांड्यापैकी सुमारे एक लाख ३७ हजार ५०० रुपये किमतीचे ५५ हांडे त्यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आले आहेत. चोरीची ही घटना २० मार्च रोजी रात्रीच्या वेळी घडली होती. याबाबत जुन्नर पोलीस स्टेशनला व्यावसायिक आनंद हेमंत सासवडे यांनी फिर्याद दिली होती. महाजन आळी-जुन्नर येथील त्यांच्या भांड्याच्या गोडाऊन मधून तीन महिलांनी ही चोरी केल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत होते. ह्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेमार्फत समांतर तपास करत असताना परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ची पाहणी केली असता भांड्याच्या गोडाऊन मधून काही अज्ञात महिला हांडे चोरून नेत असताना दिसून आले. यावरून सदरचा गुन्हा अज्ञात महिलांनी केल्याचे निष्पन्न झाले. गुन्हे शाखेचे सहाय्यक फौजदार दिपक साबळे व पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सदरचा गुन्हा सारिका बबन मकवाने, अंजली सुरज वाघमारे, सुरेखा राजू वालेकर सर्व रा. पंचलिंग झोपडपट्टी वस्ती जुन्नर यांनी केल्याचे निष्पन्न झाले. गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार कुरण फाटा, जुन्नर येथे सापळा लावून सदर महिलांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा कबूल केला. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर,जुन्नरचे पोलीस निरीक्षक किरण अवचर,सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार,सहाय्यक फौजदार दिपक साबळे, पोलिस हवालदार राजू मोमीन,संदीप वारे,अक्षय नवले, निलेश सुपेकर, नंदा कदम, सुजाता कदम, सागर हिले यांनी केली आहे.



## ॲड. सदावर्ते, डॉ. केळकर यांना 'विश्वबंधुता दर्पण पुरस्कार' जाहीर

पुणे (आरंभ पर्व) : विश्वबंधुता साहित्य परिषदेच्या वतीने दिला जाणारा 'विश्वबंधुता दर्पण पुरस्कार' यंदा ज्येष्ठ साहित्यिक ॲड. प्रार्थना सदावर्ते आणि प्रसिद्ध नेत्ररोगतज्ञ डॉ. आदित्य केळकर यांना जाहीर करण्यात आला आहे. तसेच संस्थेसाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालयाची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रग्रंथ संविधान, तिरंगा महावस्त्र, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. येत्या १२ एप्रिल २०२६ रोजी नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात आयोजित २८ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनामध्ये या पुरस्काराचे होईल, अशी माहिती संमेलनाध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली. विश्वबंधुता साहित्य परिषद, भारतीय जैन संघटनेचे वाघोली येथील महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन या संस्थांच्या वतीने आयोजित या संमेलनाचे उद्घाटन सकाळी दहा वाजता पूर्वाध्यक्ष प्रा. सुभाष वारे यांच्या हस्ते होईल. प्रसंगी कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. मनीषा बोरा, स्वागताध्यक्ष प्रा. शरयू पवार, निमंत्रक मंदाकिनी रोकडे, डॉ. अरुण आंधळे, प्रा. चंद्रकांत वानखेडे, प्रा. शंकर आथरे यांची उपस्थिती राहील, असे रोकडे यांनी सांगितले. दुपारच्या सत्रात ज्येष्ठ कवी विनोद सावंत यांच्या अध्यक्षतेखाली 'वंदे संविधान' काव्यसंमेलन होईल. त्यामध्ये संगीता झिंजुरके, डॉ. अशोककुमार पगारिया यांच्यासह महाराष्ट्रातील तीस नामांकित कवी सहभागी होतील. पुरस्कार वितरणाने संमेलनाचा समारोप होईल. संमेलनामध्ये विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या दूरदर्शी, पारदर्शी, सर्वस्पर्शी, बंधुतादर्शी आणि मानवतादर्शी निवडक मान्यवरांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात येईल. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी प्रा. भारती जाधव, सीमा गांधी, विद्या अटक, प्रा. सायकी गोसावी, तुकाराम कांबळे, सुनील बोरसे, डॉ. बंडोपेत कांबळे, डॉ. सविता पाटील आणि प्रा. प्रशांत रोकडे यांनी विशेष पुढाकार घेतला, असल्याचेही त्यांनी नमूद केले.



# जिल्हा परिषदेच्या शाळांना जलशुद्धीकरण व सौर ऊर्जा युनिट

### आयडीबीआय बँक व डिसेंट फाउंडेशनचे सहकार्य

जुन्नर (दै. आरंभ पर्व)

जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तीन शाळांना 'जलशुद्धीकरण यंत्र' (RO Plant) आणि पाच किलो वॉटचे 'सोलर एनर्जी युनिट' प्रदान करण्यात आले. तालुक्यातील ओतूर,गोळेगाव व ठाकरवाडी (वारूळवाडी ) या तीन शाळांना आयडीबीआय बँकेच्या सी.एस.आर. (CSR) निधीतून ही सुविधा पुरविण्यात आली आहे. यासाठी डिसेंट फाउंडेशन पुणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी लाभ होणार आहे. गोळेगाव ता.जुन्नर येथे शाळेतील गुणवंत विद्यार्थीनीच्या शुभहस्ते सौर ऊर्जा प्रकल्प व आर ओ प्लांट चे उद्घाटन करण्यात आले.

या उपक्रमांमुळे शाळेतील शेकडो विद्यार्थ्यांना आता शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे. दुर्गम भागातील वीज समस्येवर मात करण्यासाठी बसवण्यात आलेल्या सोलर युनिटमुळे शाळेचा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रश्न मिटण्यास मदत होणार आहे. शाळेत संगणक शिक्षण व इतर शैक्षणिक उपक्रम राबवणे आता अधिक सुलभ होणार आहे.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी या मदतीबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, "आमच्या शाळेतील बहुतांश विद्यार्थी हे आदिवासी व ग्रामीण भागातील आहेत. शुद्ध पाणी आणि अखंड वीज या मूलभूत गरजा पूर्ण झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यात सुधारणा होईल आणि त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवे बळ मिळेल. IDBI बँक आणि डिसेंट फाउंडेशनचे हे सहकार्य आमच्या शाळेच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरेल." संस्थेच्या या सामाजिक बांधिलकीबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. भविष्यातही अशाच प्रकारे ग्रामीण भागातील शाळांचे सक्षमीकरण करण्याचा मानस संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

याप्रसंगी डिसेंट फाउंडेशचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव एफ. बी. आतार ,संचालक आदिनाथ चव्हाण, शिरीष डुंबरे, श्री लेण्याद्री देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे सचिव शंकरराव ताम्हाणे, विश्वस्त जयवंत डोके, काशिनाथ लोखंडे सदाशिव ताम्हाणे, रोहिदास बिडवई , जुन्नर तालुका खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष दीपक कोकणे ,माजी सरपंच गणेश लोखंडे, ग्रामपंचायत सदस्य अरविंद बिडवई, पल्लवी वाणी गिरीजा ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेचे अध्यक्ष राजेश बिडवई शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सचिन माळी,सूर्यकांत माळी, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष ऋषभ बिडवई ,सिद्धेश लोखंडे, अनिल बिडवई ,छाया ढेकणे, मोहन लोखंडे गुरुजी, लेण्याद्री महिला पतसंस्था अध्यक्ष अलका माळी ,रेश्मा कोकणे, कुंदा वऱ्हाडी , लक्ष्मी मेहेर ,अनिता बिडवई, गोळेगाव शाळेचे मुख्याध्यापक मोहन नाडेकर, मारूती साबळे, उमेश शिंदे आदी मान्यवर ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन दत्तात्रेय उगले यांनी केले. किरण पवार यांनी आभार मानले.

## रिक्षा व दुचाकी अपघातात पोलीस अंमलदाराचा मृत्यू

राजगुरूनगर -किरण खुडे (दै. आरंभ पर्व)



शहराजवळील पाबळ रस्ता येथील टाकळकरवाडी फाटा परिसरात झालेल्या अपघातात पोलीस अंमलदाराचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. शशिकांत श्रीधर होले (वय ३७, रा. होलेवाडी, ता. खेड) असे या दुर्दैवी घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या पोलीस अंमलदारांचे नाव आहे. ते चाकण जवळील महाळुंगे पोलीस स्टेशन येथे कार्यरत होते. त्यांच्या अकाली निधनाने पोलीस दलात हळहळ व्यक्त केली जात आहे. या अपघाताबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि. २८) रात्री सुमारे साडेदहा वाजण्याच्या सुमारास शशिकांत होले हे बुलेट मोटारसायकलवरून आपल्या होलेवाडी येथील घरी जात होते. त्यावेळी समोरून येणाऱ्या रिक्षाने अचानक वळण घेतल्याने बुलेट आणि रिक्षामध्ये जोरदार धडक झाली. या भीषण धडकेत होले दुचाकीवरून खाली कोसळले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. शशिकांत होले हे धाडसी व कर्तव्यनिष्ठ पोलीस कर्मचारी म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. त्यांचे बंधू श्रीकांत होले हेही पोलीस दलात कार्यरत आहेत. राजगुरुनगर येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## एस. एफ. आय. जुन्नर तालुका समितीच्या अध्यक्षपदी सुरज बांबळे

### सचिवपदी स्वामी गवारी





जुन्नर (दै. आरंभ पर्व)

स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एस.एफ.आय) च्या जुन्नर तालुका समितीचे ध्यक्षपदी सुरज बांबळे व सचिव पदी स्वामी गवारी यांची निवड करण्यात आली आहे. एस.एफ. आयच्या जुन्नर तालुका समितीचे २२ वे अधिवेशन बुधवारी (दि.२५) जुन्नर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी अध्यक्ष, सचिव तसेच सतरा सदस्यांची तालुका समिती निवड करण्यात आली. सात सचिव मंडळ निवडण्यात आले. अधिवेशनाचा शुभारंभ प्रसंगी संघटनेचा ध्वज फडकविण्यात आला. शहीद भगतसिंग यांना अभिवादन करण्यात आले. उद्घाटन सत्र, प्रतिनिधी सत्र, समिती निवड अशा तीन टप्प्यात अधिवेशन पार पडले. एस.एफ.आय पुणे जिल्हा माजी नेते गणपत घोडे यांनी आजची शैक्षणिक, सामाजिक परिस्थिती आणि विद्यार्थी चळवळीची भूमिका या विषयावरती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय आदिवासी अधिकारी मंचाचे नेते प्रा.संजय साबळे राज्य उपाध्यक्ष नवनाथ मोरे यांनी देखील मार्गदर्शन केले. जिल्हा सहसचिव समीर गारे यांनी निरीक्षण मांडले व अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. या अधिवेशनात वार्षिक अहवालांचे वाचन करून संघटनेच्या कमजोऱ्या आणि संघटनेचे बलस्थाने यावर विचारमंथन करून पुढील वर्षभरात संघटनेची दिशा व लढा काय असावा? याविषयी ठराव मांडण्यात आले. सरकारी शाळा बळकट करण्यासाठी दत्तक शाळा योजना व समूह शाळांच्या विरोधातील लढा तीव्र करा तसेच महिलांवरील अत्याचार, शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना "शून्य शुल्क प्रवेश" योजनेची अंमलबजावणी तसेच वसतिगृह आणि आश्रमशाळांच्या प्रश्नाविषयी लढा तीव्र करण्याबाबतचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. नवीन समितीचा प्रस्तावास एकमताने मान्यता घेण्यात येऊन तालुक्याची पुढील तालुका समिती नेमण्यात आली . त्यानंतर नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष सुरज बांबळे सचिव स्वामी गवारी यांची एकमताचे निवड करण्यात आली. यावेळी उपाध्यक्षपदी प्रज्वल करवंदे, कोषाध्यक्षपदी साहिल जोशी, सहसचिवपदी विनायक इरणक, कायम निमंत्रित सचिव मंडळ सदस्य श्वेता शेखरे, ऋषिकेश कचरे, सदस्य साहिल कोरडे, निलेश मोरे, अक्षय लोहकरे, अक्षदा पोफळे, वैशाली डामसे, आरती इरणक, दीपिका गवारी यांची तालुका समितीचे पदाधिकारी म्हणून एकमताने निवड करण्यात आली.

**समारोप सत्रात किसान सभेचे तालुका सचिव लक्ष्मण जोशी यांनी अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या तसेच जिल्हा सहसचिव समीर गारे यांनी निरीक्षण मांडले अक्षय साबळे यांनी मनोगत व्यक्त केली नवनाथ मोरे यांनी शुभेच्छा दिल्या त्यानंतर या अधिवेशनासाठी तालुक्यातून ३० विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंतर "हम होंगे कामयाब" या गीताने अधिवेशनाची सांगता झाली.**

# राकेश मोरे यांना प्राइड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार देऊन सन्मान

### नऱ्हे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात




पुणे (दै. आरंभ पर्व)

ग्रीन वर्ल्ड व जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. या सोहळ्यात महिराज डेव्हलपर्स चे डायरेक्टर राकेश मोरे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. यावेळी मृदा व जलसंधारण विभागाचे सचिव आयएएस सुनील चव्हाण यांच्या हस्ते हा सन्मान त्यांना देण्यात आला..

ह्या कार्यक्रमाचे आयोजन ग्रीन वर्ल्ड चे डायरेक्टर प्रसिद्ध लेखक गौतम कोतवाल यांच्या मार्गदर्शनाखाली व जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट करण्यात आले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या नियोजनामुळे संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि प्रभावीपणे पार पडला. उद्योजक राकेश मोरे यांनी आपल्या कार्यातून समाजात वेगळी ओळख निर्माण केली असून त्यांच्या योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. त्यांनी त्यांच्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त पुण्यात राहणाऱ्या गोरगरिबाचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी रो हाऊस देण्यासाठी लकी ड्रॉ कार्यक्रम घेऊन सोडत काढण्यात आली. त्यामध्ये उत्तम नगर येथील एका नागरिकाचे लवकरच स्वप्न पूर्ण होणार आहे. याशिवाय संत बाळूमामा यांचे अध्यात्मिक संस्कार आहे. प्रतिवर्षी हे विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात याशिवाय इतरही उपक्रमास मदत करत असतात. त्यामुळेच त्यांना प्राईड ऑफ महाराष्ट्र हा पुरस्कार देण्यात आला आहे. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी आयोजकांचे आभार मानले व पुढेही समाजासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प व्यक्त केला. या सोहळ्यात विविध क्षेत्रातील उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी आपल्या भाषणातून समाज विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. एकूणच हा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून उपस्थितांना प्रेरणा देणारा ठरला.

# आरएमसीचा राडारोडा अन् पुण्यात केमिकलयुक्त पाणी थेट नदीत

- वडगाव खुर्द परिसरातील प्रकाराकडे प्रशासनाचे दुर्लक्ष
- राजकीय वरदहस्त असल्यानेच कारवाई होत नसल्याची चर्चा
- बांधकामाच्या राडारोड्यासाठी महापालिकेने वाघोली येथे प्रकल्पाची व्यवस्था केलेली असताना त्याकडे फिरवली पाठ



पुणे (दै. आरंभ पर्व)

शहरातील नद्यांच्या सुशोभीकरणासाठी महापालिका कोट्यवधी रुपयांचा खर्च करत असतानाच दुसरीकडे मात्र रेडीमिक्स कॉंक्रीट (एरएमसी) प्रकल्पाचा राडारोडा आणि केमिकल मिश्रित सिमेंट स्लरी थेट मुठा नदीत सोडण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार वडगाव खुर्द येथील वडजाई माता मंदिर परिसरात सुरू आहे. दरम्यान, येथील प्रकल्पांना राजकीय वरदहस्त असल्यानेच प्रशासन प्रभावी कारवाई करत नसल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे.

शहरातील बांधकामाचा राडारोड्यासाठी महापालिकेने वाघोली येथे प्रकल्पाची व्यवस्था केली आहे. यासाठी महापालिकेने नियमावलीही तयार केली आहे. मात्र, बांधकामाचा राडारोडा वाघोली येथील खाणीकडे न पाठवता नदी पात्र, शहरातून वाहणारा कालवा, रस्ते, सार्वजनिक ठिकाणी टाकला जातो. महापालिकेकडून राडारोडा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते. मात्र, अधिकाऱ्यांचे बांधकाम व्यावसायिकांशी असणारे लागेबांधे, राजकीय हस्तक्षेप आणि दहशतीमुळे यावर प्रभावी कारवाई होत नाही. कालवा आणि नदीवर जलसंपदा विभागाची मालकी असल्याने महापालिका अधिकाऱ्यांकडून या प्रकाराकडे कानाडोळा केला जातो. तर कारवाईसाठी आमच्याकडे यंत्रणा नाही, त्यामुळे अशा अतिक्रमणांवर महापालिकेनेच कारवाई करावी, असे म्हणत जलसंपदाचे अधिकारी हात झटकतात. जलसंपदा विभाग आणि महापालिका प्रशासनाच्या या ढकलाढकलीचा गैरफायदा घेत खुलेआमपणे राडारोडा नदीत टाकला जातो. वडगाव खुर्द (जुने गावठाण) येथील वडजाईमाता मंदिराच्या परिसरात पाच आरएमसी प्रकल्प आहेत. यातील काही प्रकल्प हे नदीपात्राच्या लगत थाटण्यात आले आहेत. या प्रकल्पातील सिमेंट कॉंक्रीटचा राडारोडा, केमिकल मिश्रित स्लरी थेट नदीत सोडण्यात येते. यामुळे नदीतील पाणी पांढरे व लालसर झाले आहे. तसेच गाडीमध्ये शिल्लक राहिलेली सिमेंट मिश्रित खडी जागा मिळेल तिथे खाली केली जाते.

येथील प्रकल्पांवर महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून कारवाई केली जाते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळांवरून आणि तहसीलदारांकडून नोटीस दिल्या जातात. मात्र, राजकीय वरदहस्तामुळे ही कारवाई नावालाच आणि तकलादूपणाची होते. कारवाईनंतर काही दिवसांत किंवा काही तासांत पे प्रकल्प पुन्हा सुरू होतात. याशिवाय या परिसरातच नदीपात्रापर्यंत मुरूम आणि राडारोडा टाकून व्यावसायिक वापरासाठी प्लॉट तयार करण्याचे कामही सुरू आहे. त्यामुळे नदीला कोणी वाली आहे की नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

आरएमसी प्रकल्पात ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या दिवसभरात दीडशे पेक्षा अधिक आहे. यामुळे या परिसरात धुळीचे साम्राज्य आहे. या धुळीमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या असून, फुफ्फुसाचे आजार होण्याचा धोका आहे. यासंदर्भात प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी केल्या आहेत. मात्र, ठोक कारवाई होत नाही. कारवाई केली तर ती केवळ नावालाच होते. कारवाईनंतर काही तासात पुन्हा प्रकल्प तयार होतात. शिवाय महापालिकेच्या डीपीमध्ये मैदानासाठी आरक्षित असलेल्या जागेचाही वापर या वाहनांकडून केला जातो.

**येथील आरएमसी प्रकल्पांवर यापूर्वीही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकल्पाची पुन्हा एकदा तातडीने पाहणी करून योग्य ती कारवाई केली जाईल.**
**- अनिरुद्ध पावसकर, शहर अभियंता, महापालिका**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.